**ePaper** ‘संविधान खरंच खतरे में है...’, अरविंद सावंत यांचा भाजपवर जोरदार हल्लाबोल



| वर्ष - 8 | अंक - 258 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com | रविवार, दि. 13 एप्रिल 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- मोहम्मद शमीच्या गोलंदाजीची खांडोळी
- अभिषेकच्या शतकाचं अनोखं सेलिब्रेशन
- मुर्शिदाबाद प्रकरणी मोठी कारवाई
- वक्फबाबत विरोधी पक्षनेत्याचं मौन

## ’नॅशनल हेरॉल्ड’ प्रकरणात ‘ईडी’ची मोठी कारवाई

# सोनियांची 700 कोटींची मालमत्ता जप्त करणार!

## काँग्रेसचे म्हणणे : ही तर सूडबुद्धीने कारवाई

। नवी दिल्ली । प्रतिनिधी । महाईन्यूज

**‘ईडी’ च्या एका निर्णयामुळे काँग्रेस नेत्या सोनिया गांधी आणि नेते राहुल गांधी खूपच संकटात सापडले आहेत. ‘नॅशनल हेरॉल्ड’ प्रकरणी त्यांची चौकशी सुरू असून त्यांच्याशी संबंधित असलेली सुमारे ७०० कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्याचे आदेश ‘ईडी’ ने दिले आहेत.**



### दिल्ली, मुंबई आणि लखनौत मालमत्ता..

जप्त करण्यात येणाऱ्या या मालमत्ता नवी दिल्ली, मुंबई आणि लखनौ येथील अतिशय मोक्याच्या ठिकाणी आहेत, असे ईडीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. नवी दिल्लीमध्ये बहादुर शाह सफर मार्गावर असलेले ‘नॅशनल हेरॉल्ड’ चे ऐतिहासिक मुख्यालयदेखील जप्त करण्यात येणार आहे.

**मालमत्ता जप्त करण्याची नोटीस! भाजपाच्या म्हणण्यानुसार.. ‘ये तो बस एक झाँकी हैं..’**

### ‘नॅशनल हेरॉल्ड’ नेमके काय आहे?

नॅशनल हेरॉल्ड हे वृत्तपत्र ए. जे. एल या संस्थेद्वारे प्रकाशित केले जात होते आणि ते यंग इंडियन प्रायव्हेट लिमिटेड च्या मालकीचे आहे. या कंपनीचे सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्याशी संबंध असून ईडीने एकूण ६६१ कोटी रुपयांची स्थावर मालमत्ता ताब्यात घेण्यासाठी ए. जे. एल. कंपनीला नोटीस बजावली आहे. नवी दिल्लीतील आयटीओ येथील ‘हेरॉल्ड हाऊस’, मुंबईतील ब ां द्रे परिसरातील या कंपनीची मालमत्ता आणि लखनौ मधील विश्वेश्वर नाथ मार्गावरील ए.जे.एम. इमारतीत या नोटिसा चिकटवण्यात आल्या आहेत. मुंबईतील मालमत्तेच्या बाबतीत जागा रिकामी करण्यास किंवा भाडे ईडीला देण्यास नोटीसीमध्ये स्पष्ट सांगण्यात आले आहे.

### मनी लॉंडरिंगचे प्रकरण..

मनी लॉन्डरिंग प्रतिबंधक कायद्याच्या कलम ( 8) आणि नियम ५ (१) अंतर्गत ही कारवाई करण्यात आली आहे. यामध्ये ईडीने जप्त केलेल्या आणि प्राधिकरणाने पुष्टी केलेल्या मालमत्ता ताब्यात घेण्याची प्रक्रिया प्रदान केली आहे. या स्थावर मालमत्ता ईडीने नोव्हेंबर २३ मध्ये जप्त केल्या होत्या. ईडीचा हा मनी लँडरिंगचा खटला ए. जे. एल. आणि यंग इंडियन विरुद्ध आहे. ‘नॅशनल हेरॉड’ हे ए. जे. एल. द्वारे प्रकाशित केले जाते आणि ते यंग इंडियन प्रायव्हेट लिमिटेड च्या मालकीचे आहे

### डॉ. सुब्रमण्यम स्वामी यांचा नेमका आरोप काय?

डॉ. सुब्रमण्यम स्वामी यांनी आरोप केला आहे की असोसिएटेड जनरल लिमिटेड ( ए जे एल ) ने काँग्रेस पक्षाला ९० कोटी रुपयांच्या वसुलीच...

### राहुल, सोनिया यांच्या मालकीची कंपनी

काँग्रेस नेत्या सोनिया गांधी आणि राहुल गांधी हे यंग इंडियन चे प्रमुख भागधारक आहेत. त्यांच्याकडे प्रत्येकी ३८ टक्के शेअर्स असून यंग इंडियन आणि ए जे एल च्या मालमत्तेचा वापर १८ कोटी रुपयांच्या बनावट देणग्या, ३८ कोटी रुपयांचे बनावट आगाऊ भाडे आणि २९ कोटी रुपयांच्या बनावट जाहिरातीच्या स्वरूपात गुन्हेगारी उत्पन्नासाठी करण्यात आला, असा आरोप आहे.

### या प्रकरणाची थोडीशी पार्श्वभूमी

ईडीने २०१४ मध्ये या प्रकरणाचा तपास सुरू केला होता. भाजपाचे ज्येष्ठ नेते डॉ. सुब्रमण्यम स्वामी यांनी हे प्रकरण खऱ्या अर्थाने उकरून काढले. २०१२ मध्ये डॉ. स्वामी यांनी ट्रायल कोर्टात याचिका दाखल करून आरोप केला होता, की काही काँग्रेस नेत्यांनी (राहुल आणि सोनिया गांधी यांच्या व्यतिरिक्त) यंग इंडिया लिमिटेड मार्फत असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड ( ए जे एल ) हे चुकीच्या पद्धतीने अधिग्रहण केले आहे आणि ताब्यात घेण्यात आले आहे. दोन हजार कोटींची दिल्लीतील ही मालमत्ता आणि हेरॉल्ड ची इमारतही ताब्यात घेण्यासाठी त्यांचे प्रयत्न सुरू आहेत, असे त्यांचे म्हणणे होते.गांधी कुटुंबाने काँग्रेस पक्षाचा निधी वापरून ए जे एल कंपनी मिळवण्याचा आरोप डॉ. स्वामी यांनी केला असून स्वामीच्या आरोपावर विश्वास ठेवायचा असेल तर ए जे एल ची दोन हजार कोटीची मालमत्ता हस्तगत करण्याचा त्यांचा उद्देश होता.

### मोदी सरकार करून टार्गेट?

ईडीची भीती दाखवून केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांना नाहक टार्गेट केले असून त्यांना त्रास दिला जात असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. तसेच ईडी पुढे झुकणार नाही अशी दर्पोक्ती राहुल गांधी यांनी पूर्वीच केलेली आहे.

काँग्रेसच्या म्हणण्यानुसार डॉ. स्वामींना या प्रकरणात कोणताही अभ्यास नाही आणि केवळ राजकीय द्वेषातून हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे, तसेच काँग्रेसने म्हटले आहे की जेव्हा हेरॉल्ड प्रकाशित करणाऱ्या एजेएल ला आर्थिक समस्यांचा सामना करावा लागला, तेव्हा काँग्रेसने त्यांना वाचवले कारण त्यांचा ऐतिहासिक वारशावर विश्वास होता.

# डॉ. घैसासांच्या अडचणी वाढल्या!

## महिलेच्या मृत्यूप्रकरणी महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलने पाठवली नोटीस

| पुणे |
महाईन्यूज | प्रतिनिधी|

**दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात पैशांअभावी वेळेवर उपचार न मिळाल्याने गर्भवती महिलेच्या मृत्यूप्रकरणी आता महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलने (एमएमसी) रुग्णालयाचे प्रसूतीतज्ज्ञ डॉ. सुश्रुत घैसास यांना गुरुवारी नोटीस बजावली आहे. डॉ. घैसास यांच्याकडून सर्व तपशील मागवण्यात आला आहे. यामुळे आता डॉ. सुश्रुत घैसास यांच्या अडचणी वाढल्या आहेत. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात पैशांअभावी वेळेवर उपचार न मिळाल्याने गर्भवती महिलेच्या मृत्यू झाला.**




या घटनेचे राज्यभर पडसाद उमटल्याचं दिसून आलं. गेल्या आठवड्यात एमएमसीने पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाला नोटीस पाठवून महिलेच्या उपचार प्रक्रियेत किती डॉक्टर सहभागी होते, याची माहिती मागवली होती. त्यानंतर एमएमसीच्या नोटिसीला उत्तर देताना डॉ. घैसास या महिलेच्या उपचारात समाविष्ट असल्याचे सांगण्यात आले आहे. रुग्णालयाच्या आलेल्या प्रतिसादाच्या आधारे एमएमसीने डॉ. घैसास यांना नोटीस पाठवली आहे. उद्या (रविवार, ता-13) पर्यंत डॉ. घैसास यांच्याकडून माहिती येणे अपेक्षित आहे. त्यानंतर मंगळवारी त्यांना सुनावणीसाठी एमएमसीच्या कार्यालयात बोलवण्यात येईल, असे एमएमसीचे प्रशासक डॉ. विंकी रुघवानी यांनी सांगितले. आम्ही अजूनही न्यायाच्या प्रतीक्षेत असल्याची भिसे कुटुंबीयांनी प्रतिक्रिया दिली आहे. तर तो व्यवस्थेतील दोष, असंवेदनशीलता आणि गैरजबाबदारीचं चित्र दाखवून गेला असल्याची प्रतिक्रिया देखील त्यांनी भिसे परिवाराने दिली आहे. फक्त राजीनामा पुरेसा नाही, त्यांना तत्काळ बडतर्फ करून वैद्यकीय परवाना रद्द करावा, आणि त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा.

सरकारने प्रत्येक हॉस्पिटलमध्ये एक सेवा प्रणाली तयार करावी, जी रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना सर्व आवश्यक माहिती, योजनांबद्दल समज व सहकार्य देईल. हीच खरी तनिषा वाहिनींच्या बलिदानाला योग्य श्रद्धांजली असेल.महाराष्ट्र शासनाकडे विनंती, उर्वरित दोन अहवाल त्वरित जाहीर करा, आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी पावले उचला अशा पाच मागण्या त्यांनी केल्या आहेत. या घटनेचे राज्यभर पडसाद उमटल्याचं दिसून आलं. गेल्या आठवड्यात एमएमसीने पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाला नोटीस पाठवून महिलेच्या उपचार प्रक्रियेत किती डॉक्टर सहभागी होते, याची माहिती मागवली होती. त्यानंतर एमएमसीच्या नोटिसीला उत्तर देताना डॉ. घैसास या महिलेच्या उपचारात समाविष्ट असल्याचे सांगण्यात आले आहे. रुग्णालयाच्या आलेल्या प्रतिसादाच्या आधारे एमएमसीने डॉ. घैसास यांना नोटीस पाठवली आहे. उद्या (रविवार, ता-13) पर्यंत डॉ. घैसास यांच्याकडून माहिती येणे अपेक्षित आहे. त्यानंतर मंगळवारी त्यांना सुनावणीसाठी एमएमसीच्या कार्यालयात बोलवण्यात येईल, असे एमएमसीचे प्रशासक डॉ. विंकी रुघवानी यांनी सांगितले. आम्ही अजूनही न्यायाच्या प्रतीक्षेत असल्याची भिसे कुटुंबीयांनी प्रतिक्रिया दिली आहे. तनिषा भिसे यांचा मृत्यू केवळ वैद्यकीय हलगर्जीपणाचा परिणाम नव्हता, तर तो व्यवस्थेतील दोष, असंवेदनशीलता आणि गैरजबाबदारीचं चित्र दाखवून गेला असल्याची प्रतिक्रिया देखील त्यांनी भिसे परिवाराने दिली आहे.

### घैसास यांच्यावर कठोर कारवाई

फक्त राजीनामा पुरेसा नाही, त्यांना तत्काळ बडतर्फ करून वैद्यकीय परवाना रद्द करावा, आणि त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा.सरकारने प्रत्येक हॉस्पिटलमध्ये एक सेवा प्रणाली तयार करावी, जी रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना सर्व आवश्यक माहिती, योजनांबद्दल समज व सहकार्य देईल. हीच खरी तनिषा वाहिनींच्या बलिदानाला योग्य श्रद्धांजली असेल.

# गुंड टिपू पठाणची पोलिसांकडून धिंड

## खंडणी मागितल्यास तक्रार करण्याचे पोलिसांकडून आवाहन

| पुणे |
महाईन्यूज | प्रतिनिधी|

**हडपसर भागातील सय्यदनगर भागात दहशत माजविणारा गुंड टिपू पठाण याच्यासह साथीदारांची पोलिसांनी शनिवारी धिंड काढली. टिपू पठाण आणि साथीदाराविरुद्ध एका महिलेची जमीन बळकाविल्याप्रकरणी नुकताच काळेपडळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.**



सय्यदनगर भागात रिझवान उर्फ टिपू पठाणची दहशत आहे. पठाणे याने एका कार्यक्रमात नोटांची उधळण केल्याची घटना नुकतीच घडली होती. समाज माध्यमात चित्रफीत प्रसारित केली होती. समाज माध्यमात चित्रफीत प्रसारित केल्याप्रकरणी पठाणसह साथीदारांविरुद्ध पोलिसांनी त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला होता.पठाण आणि साथीदारांनी एका महिलेची जमीन बळकाविल्याचा प्रकार नुकताच उघडकीस आला होता. संबंधित महिलेने काळेपडळ पोलिसांकडे तक्रार दिली होती. याप्रकरणी रिझवान उर्फ टिपू सत्तार पठाण, सद्दाम सलीम पठाण, एजाज युसूफ इनामदार, नदीम बाबर खान यांना अटक करण्यात आली होती.त्यानंतर पोलिसांनी शनिवारी सायंकाळी पठाण याच्यासह साथीदारांची सय्यदनगर भागात धिंड काढली. पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली काळेपडळ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मानसिंग पाटील आणि पथकाने ही कामगिरी केली. पटाण याने नागरिकांना धमकावून खंडणी उकळणे, तसेच जमीन बळकाविल्याचे गुन्हे केल्यास तक्रार करावी, असे आवाहन पोलीस निरीक्षक पाटील यांनी केले आहे.सय्यदनगर भागात रिझवान उर्फ टिपू पठाणची दहशत आहे. पठाणे याने एका कार्यक्रमात नोटांची उधळण केल्याची घटना नुकतीच घडली होती. समाज माध्यमात चित्रफीत प्रसारित केली होती. समाज माध्यमात चित्रफीत प्रसारित केल्याप्रकरणी पठाणसह साथीदारांविरुद्ध पोलिसांनी त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला होता.

### साथीदारांची पोलिसांनी काढली धिंड

संबंधित महिलेने काळेपडळ पोलिसांकडे तक्रार दिली होती. याप्रकरणी रिझवान उर्फ टिपू सत्तार पठाण, सद्दाम सलीम पठाण, एजाज युसूफ इनामदार, नदीम बाबर खान यांना अटक करण्यात आली होती. हडपसर भागातील सय्यदनगर भागात दहशत माजविणारा गुंड टिपू पठाण याच्यासह साथीदारांची पोलिसांनी शनिवारी धिंड काढली.

## महामार्ग, वर्दळीच्या ठिकाणांवर होर्डिंग काढून टाकण्याचे आदेश

# आता अनधिकृत होर्डिंग्स रडारवर!

### पिंपरी चिंचवड महापालिका आणि पीएमआरडीए ॲक्शन मोडवर

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड महापालिका आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) यांनी अनधिकृत होर्डिंग बाबत सक्त पावले उचलले आहेत. पीएमआरडी कार्यक्षेत्रातील अनधिकृत होर्डिंग स्वागत सद्यस्थिती जाणून घेत तातडीने महामार्ग, गर्दीची ठिकाणे तसेच पावसाळ्यापूर्वी धोकादायक ठरणारे होर्डिंग काढून टाकण्याचे आदेश विभागाला दिले आहेत. तर पिंपरी चिंचवड महापालिकेने 15 जून पर्यंत होर्डिंगवर जाहिरात बाजी करू नये असे आदेश दिले आहेत.**



पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) हद्दीतील अनधिकृत होर्डिंगवर कारवाई करण्यात येणार आहे. ८ एप्रिलपर्यंत संबंधितांनी होर्डिंगच्या परवानगीसाठी दाखल केलेल्या प्रस्तावांच्या प्रती कार्यालयात सादर करण्याचे आदेश देण्यात आले होते. सद्यस्थिती जाणून घेतल्यानंतर पीएमआरडीएच्या वतीने पुढील आठवड्यात अनधिकृत होर्डिंग हटवण्यात येणार आहेत.

पीएमआरडीएच्या सहआयुक्त (प्र.) डॉ. दीप्ती सूर्यवंशी-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आकुर्डी येथे होर्डिंगधारक व होर्डिंग संघटनेची बैठक झाली. उपजिल्हाधिकारी प्रमोद कुदळे, तहसीलदार रवींद्र रांजणे, सचिन मस्के, सहायक नगर रचनाकार राहुल गीते, शाखा अभियंता विष्णू आव्हाड, ऋतुराज सोनवणे, दीप्ती घुसे, विशाल भोरे, होर्डिंगधारक व होर्डिंग संघटनेचे अध्यक्ष प्रकाश जमदाडे, उपाध्यक्ष शेखर मते आदी उपस्थित होते.

होर्डिंगला परवानगी घेणे, धोकादायक होर्डिंग काढून घेणे यासह संघटनेच्या अडचणींबाबत बैठकीत चर्चा झाली. अवकाळी, वादळी वाऱ्याच्या हवामान अंदाजानुसार पुढील दोन दिवसांत धोकादायक होर्डिंग काढण्याचे निर्देश बैठकीत दिले. पीएमआरडीएच्या परवानगीशिवाय नवीन आकाशचिन्ह उभारले जाणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे आवाहन डॉ. दीप्ती सूर्यवंशी-पाटील यांनी केले.

#### 15 जून पर्यंत फ्लेक्सबाजीवर बंदी

पावसाळ्यापूर्वीच्या वादळी वाऱ्यामुळे होर्डिंग कोसळून दुर्घटना घडण्याची शक्यता असते. त्यामुळे खबरदारीचा उपाय यावर्षी प्रथमच १५ एप्रिल ते १५ जून या कालावधीत होर्डिंगवर जाहिरात न लावता ते रिकामे ठेवावेत, होर्डिंगचे स्ट्रक्चर खराब झाले असल्यास ते तातडीने दुरुस्त करून घ्यावे, असा सूचना होर्डिंगचालक व मालकांना दिल्या आहेत.
**- डॉ. प्रदीप ठेंगल,** उपायुक्त, आकाशचिन्ह व परवाना विभाग

#### दुर्घटना घडल्यास थेट "हे" जबाबदार

अवकाळी, वादळी वाऱ्यामुळे रहदारीच्या जागेसह मुख्य चौकातील होर्डिंग काढावेत. असे न झाल्यास होणाऱ्या दुर्घटनेस होर्डिंगधारकास जबाबदार धरत कारवाई होईल. विशेषतः हिंजवडी परिसर, हवेली तालुक्यातील वाघोली, मांजरी, नऱ्हेसह पौड रस्ता, सूस रस्ता, पुणे-सातारा, पुणे-सोलापूर, पुणे-नाशिक, पुणे-नगर, हडपसर-दिवे घाट, तळेगाव-चाकण-शिक्रापूरह यासह सर्व राष्ट्रीय महामार्ग, राज्य मार्ग तसेच वर्दळीच्या ठिकाणचे होर्डिंग काढावेत. असे आदेश देण्यात आले आहेत. मुख्य म्हणजे होर्डिंगबाबत अनुचित दुर्घटना घडल्यास होर्डिंगमालक, फलकावर असणाऱ्या जाहिरातदार व जागा मालक यांना जबाबदार धरण्यात येईल.

#### पिंपरी महापालिका ॲक्शन मोडवर

आगामी काही दिवसांत जोरदार वादळी वारे, अवकाळी पाऊस आदींमुळे जाहिरात होर्डिंग कोसळून दुर्घटना घडण्याची शक्यता असते. त्यामुळे खबरदारी म्हणून शहरातील सर्व होर्डिंगवर १५ एप्रिल ते १५ जून या दोन महिने कालावधीत जाहिरात बॅनर लावू नका, असा आदेश पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाने होर्डिंगधारकांना दिला आहे. शहरातील किवळे येथे १७ एप्रिल २०२३ रोजी अनधिकृत होर्डिंग कोसळून पाच मजुरांचा मृत्यू झाला होता. या दुर्घटनेनंतर प्रशासनाने होर्डिंगच्या नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली आहे.

---

## पावसाळापूर्व कामांसाठी आ. लांडगे यांच्या प्रशासनाला सूचना

### सर्वसामान्य नागरिकांनी गैरसोय होता कामा नये, क्षेत्रीय कार्यालयात संबंधित अधिकाऱ्यांची बैठक

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरातील सर्वसामान्य नागरिकांची प्रलंबित कामे तातडीने पूर्णत्वाला जातील याची खबरदारी घ्या. मूलभूत विकास कामांना प्राधान्य द्या. रहदारीचे रस्ते, अतिक्रमण सांडपाणी निचरा यासारख्या मूलभूत प्रश्नांबाबत नागरिकांच्या समस्या असतील तक्रारी येत असतील, तर तातडीने यांचा निपटारा होईल याची काळजी घेण्याची सूचना भाजपा आमदार महेश लांडगे यांनी केली.**



पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अंतर्गत येणाऱ्या फ प्रभाग कार्यालयाच्या कामकाजाचा आढावा शुक्रवारी आमदार महेश लांडगे यांच्या उपस्थितीमध्ये घेण्यात आला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते निलेश नेवाळे, भाजपा सरचिटणीस अजय पाताडे, प्रभाग अध्यक्ष संतोष ठाकूर, घरकुल फेडरेशनचे सुधाकर धुरी, युवराज निलावर, नगररचना अधिकारी प्रमोद गायकवाड, व्ही. के वायकर, पाणीपुरवठा, स्थापत्य, आरोग्य यांसह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते. आमदार महेश लांडगे म्हणाले, एप्रिल महिना सुरू झाला आहे. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पाण्याच्या टंचाई बाबत उपाय योजना तातडीने अमलात आणणे गरजेचे आहे. भोसरी मतदारसंघात येणाऱ्या उपनगरीय भागांमध्ये पाणीटंचाई बाबत कोणत्याही समस्या नागरिकांना भेडसावणार नाहीत याची काळजी घ्यावी. याचबरोबर मान्सूनपूर्व कामांचा आढावा देखील यावेळी घेण्यात आला. पावसामुळे शहरात गटार, रस्ते, नाला अशा ठिकाणी पाणी तुंबणे, पाणी घरात शिरणे, घराची पडझड होणे, वादळ वाऱ्यामुळे झाडे पडणे अशा दुर्घटना घडू शकतात. या पार्श्वभूमीवर कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवू नये यासाठी उपाययोजना करण्यासाठी आराखडा तयार करण्यात यावा. अशाही सूचना यावेळी बैठकीत देण्यात आल्या.

> क्षेत्रीय कार्यालयांचा थेट संबंध नागरिकांच्या रोजच्या मूलभूत सुविधांच्या पूर्ततेसाठी येत असतो. त्यामुळे क्षेत्रीय कार्यालयांनी नागरिकांच्या प्रत्येक समस्येचा पाठपुरावा करणे आवश्यक आहे. पाणी, रस्ते, आरोग्याच्या सुविधा नागरिकांना उपलब्ध करून देणे आमची जबाबदारी आहे. त्याप्रमाणे प्रभाग कार्यालयाला सूचना करण्यात आल्या. उन्हाळा आणि मान्सूनपूर्वक कामे या अनुषंगाने तातडीने आराखडा तयार केला जावा असे देखील सांगण्यात आले आहेत.
> **- महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.




**गेल्या दोन-तीन आठवड्यांतल्या बातम्या खरेच मन सुन्न करणाऱ्या आहेत. दिल्ली उच्च न्यायालयातील एका न्यायाधीशांच्या घरात आग लागते काय, त्यात कैक रुपयांच्या नोटा जळतात काय, ते प्रकरण काही दिवस 'मीडिया'मधून नको तितके तापल्यानंतर अचानक बातमी बॅक फूट वर जाते काय सगळेच विचित्र. मग अचानक मंगेशकर रुग्णालय फ्रंट फुटवर चर्चेत आले.**

# कुणावर विश्वास ठेवायचा?



आता येथील हॉस्पिटल प्रशासन, वारेमाप फी आकारणारे डॉक्टर, उपचार देण्याआधी- रुग्णालयात दाखल करून घेताना- झालेले संवेदनशीलतेचा अभाव असलेले वर्तन हे सारे प्रसारमाध्यमांतून गाजते आहे. या रुग्णालयासाठी जागा घेताना मंगेशकर कुटुंबांनी सरकारकडे केलेली याचना, आणि नंतर चॅरिटी सोडून दवाखान्याला आलेले आजचे स्वरूप बघता कोणते क्षेत्र आता स्वच्छ ,प्रामाणिक राहिले असा प्रश्न निर्माण होतो. आपण याचा विचार कसा करणार हे महत्त्वाचे आहे.या निमित्ताने मंगेशकर कुटुंबाबद्दल राग व्यक्त करणारी बरीच चर्चा विशेषत: समाजमाध्यमांतून झाली. व्यक्त झालेल्या त्या रागाला कारणे होती, ती आजवर दबली होती. एकतर या सर्वच मंडळींनी आपल्या गरिबीचे नको तितके स्तोम माजवले, तेही समाजात सहानुभूती मिळवण्यासाठी. नुकत्याच एका कार्यक्रमात आशा भोसले यांनी पंतप्रधानांसमोर आमच्या वेळी लाडकी बहीण योजना असती तर आम्हाला भुकेले राहावे लागले नसते, असे विचित्र विधान करून कहर केला! गरिबी काही या एकट्या कुटुंबाच्याच नशिबी आली होती असे नाही. याहीपेक्षा गरिबी भोगलेले लोक या देशात होते आणि आहेत. त्या प्रमाणे, आपण समाजासाठी काहीतरी उदात्त करतो असा आव आणणारे दानशूर देशात परदेशात वाढले आहेत. त्यापैकी अनेक खरोखरच प्रामाणिक आहेत. यात उद्योजक, डॉक्टर्स, सामाजिक कार्यकर्ते, राजकारणी असे सारेच आहेत. अशा समाजसेवी व्यक्तींची आणि त्यांनी उभारलेल्या संस्थांची आपण दखलदेखील घेतो. पण समाजसेवेच्या नावाखाली प्रसिद्धी मिळवणाऱ्या नाटकी दानशूराची संख्या गेल्या काही काळात बरीच वाढली आहे.

दीनानाथ चॅरिटेबल ट्रस्ट हे त्यापैकीच एक ताजे उदाहरण म्हणून लोकांसमोर यावे, हे अधिक धक्कादायक होते!पण हा प्रश्न निव्वळ एका रुग्णालयाचा नाही आणि त्यामागच्या एका कुटुंबाचा तर नाहीच नाही. शिक्षण क्षेत्रापाठोपाठ मेडिकल क्षेत्रात खासगीकरण आणि कॉर्पोरेटीकरण सुरू झाल्यापासून समाजाची लूट सुरू झाली आहे. करोना काळात तर या खासगी हॉस्पिटलांच्या लोकांनी त्रस्त पेशंट अन् त्यांच्या नातेवाईकांना ज्या प्रकारे लुटले, रेमडेसिविरसारख्या- गुण सिद्धच न झालेल्या आणि उलट अनेकांना घातकही ठरलेल्या औषधांसाठी ज्या प्रकारे नातेवाईकांची मानसिक आणि आर्थिक ओढाताण झाली- त्या सुरस नसल्या तरी चमत्कारिक कथा अंगावर शहारे आणणाऱ्या आहेत. आजही पंचतारांकित हॉटेलांसारखी दिमाखात असलेली काही कॉर्पोरेट मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटले ज्या तऱ्हेने पेशंटांना लुटतात ती राक्षसी कृतीच ठरते. वैद्यकीय क्षेत्रातील नवे तंत्रज्ञान आपल्या देशात दुर्मीळ असल्यामुळे कुणालाच अवाच्यासवा किंमतवाढ केली जाते. महागड्या वैद्यकीय उपकरणांचा आणि पंचतारांकित व्यवस्थापनाचा खर्च भरून काढण्यासाठी लाखो रुपयांचे बिल आकारले जाते. त्यातही इन्शुरन्स असला की विचारायलाच नको. इन्शुरन्स, फार्मा, हॉस्पिटल यांची मिलीभगत असते हे आता उघडे गुपित. माणसाने एकदा हॉस्पिटलची पायरी चढली की तो हतबल होतो. डॉक्टरपुढे लाचार होतो. कसाही करून जीव वाचवणे, बरे होणे हेच उद्दिष्ट असते.आपण मग पैशासाठी मागे पुढे बघत नाही. प्रसंगी कर्ज काढून जीव वाचवायची तयारी असते. याचाच फायदा घेऊन ही कॉर्पोरेट हॉस्पिटलची मंडळी पेशंटांना अक्षरश: वाटेल तसे नागवतात!हे सारे प्रकार बोकाळू शकतात, यावरून साधा निष्कर्ष निघतो तो म्हणजे खासगीकरणाने प्रश्न सुटतील असे मानणाऱ्या सरकारचे आजकाल कुठेच नियंत्रण राहिलेले नाही. प्रत्येक राज्य, केंद्र शासनाच्या ढिसाळ प्रशासनाचे दाखले रोज प्रसारमाध्यमांतूनही दिसतात; उदाहरणार्थ, विशिष्टांनी कायदे मोडले तरी पोलिस काही करताना दिसत नाहीत. पण त्यापेक्षा खासगीकरणातून आलेली अनागोंदी निराळी ठरते.

## प्रासंगिक »

### 'ऑनलाइन' राक्षस

***समाजमाध्यमांनी व्यापलेल्या आजच्या पौगंडावस्थेतील मुलांची मने कोणत्या वादळात भिरभिरताहेत याची त्यांच्या पालकांना कल्पनाही येऊ शकत नाही...***

पौगंडावस्थेतील किंवा ती पार करून तारुण्याच्या उंबरठ्यावर असलेल्या मुला-मुलींचे जग पालकांना कळते आहे का आणि, त्याही पुढे जाऊन समाज म्हणून तरी त्याचे आकलन झाले आहे का या दोन्ही प्रश्नांसाठी बहुतांशांचे उत्तर 'नाही', असेच असेल, तर हे प्रश्न समजून घेण्यास पालक, समाज मुळात उत्सुक आहे का आणि कसा, यांच्या उत्तरावर या दोन्ही प्रश्नांची उकल अवलंबून असेल, असे सध्यापुरते म्हणायला हवे. 'सध्यापुरते' अशासाठी, की ज्या वेगाने सभोवताल बदलतो आहे, त्यात या सगळ्याच प्रश्नांची उत्तरे दर काही काळानंतर नव्याने शोधावी लागतील, अशी स्थिती आहे. ही 'नेटफ्लिक्स' या ओटीटी मंचावरील मालिका आणि त्यापाठोपाठ 'इन्स्टाग्राम'वरील 'लाइव्ह' या सुविधेवर १६ वर्षांखालील मुलांसाठी आणले गेलेले काही निर्बंध, या दोन्ही अलीकडच्या गोष्टींकडे उपरोल्लेखित प्रश्नांच्या परिप्रेक्ष्यात पाहायला हवे.

**गेली ३०-३५ वर्षं वसुधैव कुटुंबकम् चं बरं चाललं होतं. मालाच्या स्वस्त उत्पादनाचा आणि वाहतुकीच्या मुक्तपणाचा फायदा सगळ्यांनाच मिळत होता. पण ट्रम्प आबा कुटुंबप्रमुख झाल्यापासून सगळी घडीच विस्कटली आहे...आपल्या वसुधैव कुटुंबकम् चा कारभार नवीन 'थोरले आबा' डोनाल्ड ट्रंप यांनी दोनच महिन्यांपूर्वी हातात घेतला चुलत, मामे, मावस, आत्ते भावंडांनी आपल्या सख्ख्यांचा लईच गैरफायदा घेतलाय'.**

# ट्रम्प आबांच्या टॅरीफ चूर्णावर चीनचे टॅरीफास्त्र...



सख्खे म्हणजे त्यांची ती अमेरिकन पोरं. सावत्र म्हणजे चीनी, मेक्सिकन, कॅनेडियन. बाकी मामे, मावस, आत्ते भावंडांचा एक गट आहे ती म्हणजे युरोपीय. थोडी जरा बरी आहेत ती चुलत भावंडं (त्यात म्हणे भारतीय येतात). आल्या आल्या आबांनी फर्मान काढलं की आता इथून पुढे हे चालणार नाही. जेवढं तुम्ही मिळवाल तेवढंच आमची सख्खी अमेरिकन मिळवतील. आमच्या बरोबर व्यापारउद्योग करताना आम्हाला कमी आणि तुम्हाला जास्त असं इथून पुढं चालणार नाही. आधी आमच्या सख्ख्यांचं भलं आम्ही बघणार. त्यांचा धंदापाणी आम्हाला महत्वाचा आहे. त्यांच्या हाताला काम मिळवून देणं हे माझं पहिलं काम. गेले दोनतीन महिने यासाठी काय करायचं यावर आबांचा विचार चालू होता.आमचे थोरले आबा गेले दोन महिने सांगत होते की आता असा काही जमालगोटा देतो बघा की बाकी सगळी सुतासारखी सरळ येतील. आबांनी आधी ठरवलं की १ एप्रिलला जालीम औषध द्यायचं. पण काय आहे, आमच्या थोरल्या आबांचा स्वभाव थोडा विक्षिप्त आहे. त्यामुळे काही लोक त्यांना लहरी समजतात. ते आज काय म्हणतील त्यावर उद्या ठाम राहतील याची गॅरंटी नाही. त्यामुळे काही लोकांनी त्यांची चेष्टा सुरू केली. १ एप्रिलला आबांचा जमालगोटा म्हणजे एप्रिल फूल असणार. हे आबांच्या कानावर गेलं. मग आबा म्हणाले की बरं तुम्हाला खोटं वाटतंय तर मग २ एप्रिलला डोस देतो.शेवटी २ एप्रिलला आबानी त्यांच्या टॅरीफ नावाच्या चूर्णाचा डोस दिलाच. आता हा डोस जास्तच जालीम होता. परिवारातल्या बऱ्याच जणांना नको ते सुरू झालं. पण गमतीचा भाग असा की बाकीच्यांच्या बरोबर त्यांच्या सख्ख्या अमेरिकनांना सुद्धा लागण झाली. त्यांच्या सख्ख्या मंडळींनी सुद्धा अंथरूण धरले. काहींच्या मते हे औषधच चुकीचे आहे. आपल्या पोरांचं कल्याण करण्याच्या नादात आबांनी बाकीच्या परिवाराला दिलेल्या औषधानं पसरवलेला रोग संसर्गजन्य असेल हे आबांच्या लक्षातच आलं नाही. त्यामुळं सध्यातरी त्यांच्याच घरातली मंडळी त्रासली आहेत. त्यांच्या शेअरबाजाराचा इंडेक्स एका दिवसात रक्तबंबाळ झाला. तसं गेल्या दोन महिन्यांपासून वसुधैव कुटुंबकम् मधल्या बऱ्याच जणांची नुसतं औषध देणार म्हटल्यापासून पोटं बिघडलीच आहेत. पण आबांना हे मान्य नाही. आबा म्हणतात थोड्या दिवसांसाठी कळ सोसावी लागेल पण हे आमच्या पुढच्या पिढीसाठी आवश्यक आहे. आमचा अमेरिकन मोठा झाला पाहिजे.

## ।। अभंगवाणी ।।




शिकविलें तुम्हीं तें राहे तोंवरी ।
मज आणि हरी वियोग तों ॥१॥

प्रसंगीं या नाहीं देहाची भावना ।
तेथें या वचना कोण मानी ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### सदवस्तू साध्य करून घेण्याचा उपाय सत्संगती

एखाद्या दारूबाजाप्रमाणे विषयी मनुष्य वागत असतो. त्याला सर्व कळते, पण वळत नाही. एकीकडे स्वतःला जो परमात्म्याचा अंश म्हणवितो, आणि दुसरीकडे विषयांच्या आहारी जातो. खरोखर, भक्तीशिवाय सर्व काही वाया आहे. संताजवळ राहावे आणि भक्तीचे साधन करावे. आपल्याला काही करायचे उरले आहे असे जे वाटते, ते न वाटू लागले, म्हणजे साधनात प्रगती झाली असे समजावे. भगवंताची भक्ती घडायला गुरुसेवा हे एक मुख्य साधन आहे. जो शिष्य आज्ञा पाळतो त्याला भेटणे गुरूला भागच पडते. वास्तविक, गुरू मनात काही इच्छाच येऊ देत नाही; म्हणून कामधेनूपेक्षाही गुरू श्रेष्ठ आहे.

अत्यंत तळमळीशिवाय भगवंताचा योग शक्य नाही. संतसमागम प्रारब्धाने होतो, पण 'सम' रीतीने जाता आले तर खरा 'समागम' घडतो. पण आमचा मार्ग विषय आहे; म्हणून संत भेटूनही त्याचा 'समागम' आपल्याला होत नाही. विषयांमध्ये धुंद असलेल्या आम्हांला पाहून संतांच्या मनात कालवाकालव होते; त्याची आपल्याला कल्पनाही येणार नाही. आपली बुद्धी आपल्याला समाधानाप्रत नेत नाही, तर दुसऱ्याची मदत घेणे आवश्यक आहे. अशा वेळी, ज्यांची मदत आपण घेतो त्यांचे आपण ऐकायला नको का? भगवंताच्या जिज्ञासेचा मार्ग आक्रमायला संतांनी सांगितले. संतांना जिज्ञासा मूळचीच असते. आपल्याला ती नाही, म्हणून ती उत्पन्न करणे भाग आहे. काही केल्याशिवाय सद्वस्तू साध्य करून घेण्याचा उपाय, म्हणजे सत्संगती हा होय. सत्संगती अती अपूर्व काम करणारी आहे. ज्याचे भाग्य थोर असेल त्यालाच ती लाभेल. एखादा मनुष्य भोवऱ्यात सापडला तर त्याला बाहेर काढण्याचे दोन मार्ग आहेत. एक मार्ग असा की, दुसऱ्या चांगल्या पोहणाऱ्याने त्या भोवऱ्यामध्ये उडी मारून तो फोडायचा आणि बुडत्याला बाहेर ओढून काढायचे. पण यासाठी शक्ती फार लागते. दुसरा मार्ग असा की, आपणच भोवऱ्यामध्ये बुडी मारून तळाशी जायचे आणि खालून बाहेर निघायचे. विद्वत्ता ही भोवऱ्यासारखी आहे. वर वर पाणी फिरत असते तरी तळाशी ते संथ असते. तसे, जे लोक वरवर विद्या शिकतात ते वादाच्या आणि मतांतराच्या चक्रात सापडतात; पण जे खोल तळाशी जातात त्यांना खरे काय ते आपोआप कळते, आणि ते सगळीकडे एकच असते. विद्येच्या भोवऱ्यामध्ये सापडणाऱ्यांना बाहेर ओढून काढण्याचे काम फार मोठ्या संतांचे असते. शहाण्याने त्या भानगडीत न पडावे. हजारो लोक भगवंताच्या नामाला लावणे हे खरे संतांचे काम होय.

**बोधवचन:- कोणत्याही सत्पुरुषाची परंपरा रक्षण केली पाहिजे. त्यात आपले घुसडू नये.**

# काय राव, माणिकराव.. काय चाललंय राव!



'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील

संस्थापक, संपादक



**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळातील सर्वात वाचाळ आणि आपल्याच सरकारला आणणारा मंत्री म्हणजे माणिकराव कोकाटे ! वास्तविक अजितदादांचा हा माणूस, पण दादांनाही जुमानत नाही, अशी सध्याची अवस्था असावी ! त्याच्या बेछूट आणि बेताल वक्तव्यांना तर फडणवीसही वैतागले असावेत !**

### शेतकऱ्यांसमोर बोलताना टोलेबाजी..

कृषीमंत्रीपद सांभाळणाऱ्या कोकाटे यांनी पन्हा एकदा शेतकरी विचार, विनिमय, नियोजन न करता कांद्याचे उत्पादन घेतो आणि मग कांद्याला भाव नाही, म्हणून नाराज होतो..चिडतो असे सांगत शेतकऱ्याची चूक असल्याचे सांगितले. यापूर्वीही दोन-तीन वेळा शेतकऱ्यांना उद्देशून काहीतरी वादग्रस्त बोलण्याची परंपरा त्यांनी पुन्हा राखली आहे.

### नेहमी वादाच्या केंद्रस्थानी..

राज्याच्या मंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारल्यापासून कोकाटे नेहमी वादाच्या केंद्रभागी राहिले आहेत. दर आठवड्याला शेतकरी किंवा शेती संबंधात काही तरी वादग्रस्त बोलल्यामुळे यांच्यावर माफी मागण्याची वेळही आली आहे. हाताच्या बोटावर मोजता येण्या इतक्या दिवसांपूर्वी त्यांनी शेतकऱ्यांची माफी मागितली आहे. शेतकरी कर्ज घेतात आणि शेतीत गुंतवणूक न करता लग्नकार्य करतात, असे विधान त्यांनी काही दिवसांपूर्वी केले होते. त्या नंतर ते विधान मी गमतीने केले असा खुलासा केला होता. आता गंमत अशी कशी करतात, हा प्रश्न बाजूला ठेवू या आणि दरवेळी त्यांना गंमत करायची हुक्की कशी येते, याचे त्यांनीच उत्तर द्यावे.

### कोकाटे स्वतः शेतकरी..

कोकाटे हे स्वतः शेतकरी आहेत. गावाकडले आहेत. त्यांना कृषी व्यवहार समजतात. ते लोकप्रतिनिधी असल्याने त्यांना समाज जीवनाची जाणीव आहे असे क्षणभर समजूया. असे असताना ते असे का बोलतात ? मंत्रीमंडळात तेही कृषी सारख्या अत्यंत महत्वाच्या खात्याचे मंत्री असताना किती गांभीर्याने वागले पाहिजे, याचे भान त्यांना पाहिजे. शेती क्षेत्र राज्यातील प्रत्येक वाडीवस्ती, गाव खेड्याशी जोडलेले आहे. त्यावर आर्थिक आणि व्यावसायिक गती राज्याच्या अर्थव्यवस्थेला लाभत असते. देशाचा कणा जर शेती आहे आणि देशातील अत्यन्त महत्वाचे राज्य जर महाराष्ट्र असेल तर कृषीमंत्र्यांची जबाबदारी अधिक वाढते. हे आपल्याला समजते, त्यांना समजत नाही का?

### दिसला माईक की रेटून बोल!

आपले राज्य देशात शेती प्रारूपाचे उदाहरण व्हायला पाहिजे, अशी जिद्द खरे तर कृषी मंत्र्याची पाहिजे. मात्र, कोकाटे सवंग विधाने करून केवळ माफी मागण्याची वेळ आणत आहेत. बरं, त्यांचे नेते अजित पवार यांनी त्यांना काहीही बोलू नका, अशी तंबी दिली आहे. असे असताना सार्वजनिक ठिकाणी बोलणे, काहीही बोलणे त्यांनी टाळले पाहिजे. खरे तर सचिवांच्या बैठकीत सुद्धा हल्ली रेकोर्डिंग होत असते. त्यामुळे सचिव बैठकीत सुद्धा काहीपण बोलणे अवघड आहे. मात्र, दिसला माईक आणि पत्रकार की रेटून बोल..हे प्रकार बहुतेक सगळ्याच पक्ष प्रवक्त्यांकडून आणि मंत्री, नेत्याकडून व्हायला लागले आहेत. गमतीत, सहज, चेष्टेवारी किंवा विनोदी बोलणे, वाक्प्रचार, म्हणी, त्यातही जातीवाचक म्हणी वाक्प्रचार वापरणे, आता सगळ्यांनीच बंद केले पाहिजे, आणि तसा हुशार आहे मुख्यमंत्र्यांनी दिला पाहिजे.

### आपल्याकडे विद्वानांची कमी नाही..

आपल्या राज्यात विद्वान मंडळी सगळीच आहेत. त्यांचा भावना लगेच भडकतात, त्यात आणि गैर काय आहे? आता मंगेशकर रूग्णालयाचे डॉ. केळकर यांचेच पाहा ना. ते म्हणाले, कोणता राहू, केतू डोक्यात आला आणि घैसास यांनी दहा लाख रुपये डिपॉझिट लिहिले. झाले.. अंधश्रद्धा निर्मूलन समितीवाले खडबडून जागे झाले. दीनानाथ विरोधी नेते, पुढारी सगळेच डॉक्टरांनी राहू-केतू हे शब्द कसे उच्चारले? यावर खल करायला लागले. निषेध आणि त्यांची अक्कल, हुशारी काढायला लागले.

### शेतकरी हा तर संवेदनशील विषय..

या प्रकारावरून तरी कोकाटे यांनी शहाणे व्हायला पाहिजे, शेतकरी, शेती हा विषय अत्यंत पवित्र आहे. त्यात काम करणाऱ्यांनी या मंडळींच्या विरोधात काही बोलायचे नाही. शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत करायची, त्यांच्या कर्जाचे, विम्याचे, खत, बी, बियाणे, पाणी, वीजबिल या सगळ्या सोयीची हमी सरकारने घ्यायची नव्हे घ्यायलाच पाहिजे. त्यांच्या शेतमालाला रास्त भाव द्यायलाच पाहिजे. त्यांच्या बाजूनेच कायदा केला पाहिजे. विरोधातले कायदे रद्द केले पाहिजेत. त्यांनी कर्ज लग्न करताना वापरू दे किंवा शेतीमध्ये गुंतवणूक करो न करो.. शेतकऱ्यांना उलट प्रश्न विचारता कामा नये. या सगळ्याचे पथ्य आता कोकाटे यांनी पाळले पाहिजे.

### कर्तव्यापेक्षा हक्क महत्त्वाचे..

जनता आता हुशार झाली आहे. कर्तव्यापेक्षा हक्क अधिक समजले आहेत. हक्काचे देत नसाल, तर स्पेशल अब्रू काढू असा दणका आहे. उद्योजकांना कर्ज माफ होते, तर शेकऱ्यांना का नाही.. हा त्यांचा रास्त सवाल आहे. सगळ्यांनाच कर्ज माफ करा. अनेक सोयी मोफत द्या. वर धान्य, कपडे, शेतीची औजारे किंवा जे आवश्यक ते यावर लाडकी बहीण, ज्येष्ठ नागरिक आदी सवलती द्या. नेत्यांना राज्य चालवायचे आहे. तिजोरीत पैसे जनतेचे आहेत. जोपर्यंत आहेत, तो पर्यंत वाटून टाका. संपल्यावर तुम्ही तरी काय करणार, आम्ही तरी काय करणार ? हे मरण दिसत आहे. मध्यमवर्गीय पांढरपेशा सामान्य जनांचे. अब्रूमुळे तोंड दाबून बुक्यांचा मार, ते सहन करतात, लुटले जातात. बोटे मोडतात. पण, गप्प राहतात, तेव्हा, यापुढे तरी कोकाटे यांनी शेतकऱ्यांना काही बोलू नये. सेवेसी तत्पर राहावे, आणि ते जमत नसेल, तर मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा.. किंबहुना अजितदादांनी खरोखरच राजीनामा देण्यास त्यांना भाग पाडावे!

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.

**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# पालकमंत्री पदाचा तिढा सुटला का?

## सुनील तटकरे यांच्या घरी अमित शाह भोजनासाठी गेले होते

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**महायुती सरकारमध्ये रायगड आणि नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्री पदावरून राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्ष आणि शिवसेना (शिंदे) पक्षात जोरदार रस्सीखेच सुरु आहे. रायगड आणि नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्री पदासाठी शिवसेना (शिंदे) आग्रही आहे. जेव्हा पालकमंत्री पदाची यादी जाहीर झाली होती, तेव्हा रायगडचं पालकमंत्रिपद राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या नेत्या अदिती तटकरे यांना देण्यात आलं होतं, तर नाशिकचं पालकमंत्रिपद भाजपाचे नेते गिरीश महाजन यांच्याकडे सोपवण्यात आलं होतं. मात्र, यानंतर शिवसेनेच्या नेत्यांनी नाराजी व्यक्त केली होती. त्यामुळे त्या निर्णयाला स्थगिती देण्यात आली होती.**





रायगड आणि नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्री पदावरून महायुतीत वादाची ठिणगी पडल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होती. रायगड आणि नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाचा तिढा लवकरच सुटेल असं महायुतीच्या नेत्यांकडून सांगितलं जातंय. यातच आज देशाचे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह रायगडच्या दौऱ्यावर होते. त्यांच्या या दौऱ्यात रायगड आणि नाशिकच्या पालकमंत्री पदाच्या तिढा सुटेल अशी चर्चा आहे.यातच अमित शाह हे खासदार सुनील तटकरे यांच्या घरी स्नेहभोजनासाठी गेले होते. त्यामुळे सुनील तटकरेंच्या घरी पालकमंत्री पदाच्या तिढ्याबाबत चर्चा होण्याची शक्यता वर्तवली जात होती. त्यामुळे अमित शाह यांच्याबरोबर रायगड आणि नाशिकच्या पालकमंत्री पदाबाबत काही चर्चा झाली का? तसेच राजकीय काही चर्चा झाली का? नेमकं काय ठरलं? याबाबतची माहिती सुनील तटकरे यांनी माध्यमांशी संवाद साधताना दिली आहे.छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा दर्जासाठी कशा प्रकारे समावेश होईल? यासाठी आमची चर्चा झाली. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह सर्वांचा अगदी खेळीमेळीच्या वातावरणात संवाद होता. अमित शाह यांची ही भेट कौटुंबिक होती, राजकीय नाही. या भेटीत अमित शाह यांच्याबरोबर मनमोकळेपणाने चर्चा झाली. तसेच अमित शाह यांच्या जेवणात महाराष्ट्रीयन पदार्थांचा समावेश होता", असं सुनील तटकरे यांनी म्हटलं आहे.अमित शाह यांच्या भेटीनंतर सुनील तटकरे यांना माध्यमांच्या प्रतिनिधींनी पालकमंत्री पदाबाबत काही चर्चा झाली का? असा सवाल विचारला असता सुनील तटकरे यांनी या भेटीत रायगड आणि नाशिकच्या पालकमंत्री पदाबाबत कोणतीही चर्चा झाली नसल्याचं सांगितलं. सुनील तटकरे म्हणाले की, "देशाच्या गृहमंत्र्यांना देशात कुठं काय चाललंय? हे माहिती असतं. अनेक व्यक्तिमत्वाबाबतची माहिती त्यांच्याकडे असते. शेवटी ते मोठे नेते आहेत. राजकीय इच्छाशक्तीच्या बळावर ते आज त्या स्थानावर पोहोचलेत, याचा मला देखील अभिमान आहे. अनेकदा त्यांच्याशी संवाद साधताना देशातील राजकारणासह राज्यातील राजकारणाच्या खाचाखोचा माहिती होतात", असं सुनील तटकरेंनी म्हटलं.रायगड आणि नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्री पदावरून महायुतीत वादाची ठिणगी पडल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होती. नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाचा तिढा लवकरच सुटेल असं महायुतीच्या नेत्यांकडून सांगितलं जातंय. यातच आज देशाचे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह रायगडच्या दौऱ्यावर होते. त्यांच्या या दौऱ्यात रायगड आणि नाशिकच्या पालकमंत्री पदाच्या तिढा सुटेल अशी चर्चा आहे.यातच अमित शाह हे खासदार सुनील तटकरे यांच्या घरी स्नेहभोजनासाठी गेले होते.

### खेळीमेळीच्या वातावरणात संवाद

त्यामुळे सुनील तटकरेंच्या घरी पालकमंत्री पदाच्या तिढ्याबाबत चर्चा होण्याची शक्यता वर्तवली जात होती. त्यामुळे अमित शाह यांच्याबरोबर रायगड आणि नाशिकच्या पालकमंत्री पदाबाबत काही चर्चा झाली का? तसेच राजकीय काही चर्चा झाली का? नेमकं काय ठरलं? याबाबतची माहिती सुनील तटकरे यांनी माध्यमांशी संवाद साधताना दिली आहे.छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा दर्जासाठी कशा प्रकारे समावेश होईल? यासाठी आमची चर्चा झाली. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह सर्वांचा अगदी खेळीमेळीच्या वातावरणात संवाद होता.

# रायगडावर ऐनवेळी शिंदेंचे भाषण

## महाराजांच्या विचाराने पुढे कसं गेलं पाहिजे : अजित पवार

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**छत्रपती शिवाजी महाराजांची ३४५ वी पुण्यतिथीच्या निमित्ताने आज (१२ एप्रिल) रायगडावर कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यक्रमाला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार उदयनराजे भोसले यांच्यासह आदी नेते उपस्थित होते. या कार्यक्रमात अनेकांनी भाषण केलं. मात्र, अजित पवारांनी भाषण केलं नाही.**





मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भाषण करण्याची संधी दिली. पण अजित पवार यांना भाषणाची संधी मिळाली नाही. त्यामुळे अजित पवारांना डावलल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली. या चर्चांवर आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्टीकरण दिलं आहे. रायगडावर नेमकं काय घडलं? भाषण का केलं नाही? याचं कारण स्वत: अजित पवार यांनी माध्यमांशी बोलताना सांगितलं आहे. 'वेळ कमी होता. त्यामुळे वेळेअभावी मी रायगडावर भाषण केलं नाही', असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटलं आहे. तसेच रायगडावर कोणाकोणाची भाषणे झाली? हे देखील सांगितलं. छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचाराने पुढे कसं गेलं पाहिजे? या संदर्भाने रायगडावर चर्चा झाली. तसेच रायगडावर सर्वांनी भाषणं केले. पण वेळ कमी होता, त्यामुळे मी काही भाषण केलं नाही. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि गृहमंत्री अमित शाह यांनी भाषण केले", असं अजित पवार यांनी म्हटलं आहे.छत्रपती शिवाजी महाराजांची ३४५ वी पुण्यतिथीच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात सर्वप्रथम खासदार उदयनराजे भोसले यांनी भाषण केलं. त्यानंतर सूत्रसंचालकांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावाची घोषणा केली. मात्र, फडणवीस यांनी सूत्रसंचालकांना थांबवलं आणि सांगितलं की उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे भाषण करतील. त्यानंतर सूत्रसंचालकांनी एकनाथ शिंदे यांच्या नावाची घोषणा केली. एकनाथ शिंदे यांनी या भाषणावेळी छत्रपती शिवाजी महाराजांचा जयजयकार केला, तसेच केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचं कौतुक करत जोरदार भाषण केलं. एकनाथ शिंदे यांच्यापाठोपाठ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाषण केलं आणि शेवटी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचं भाषण झालं. मात्र, यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भाषण करण्याची संधी मिळाली नाही.

### वेळेअभावी मी रायगडावर भाषण केलं

त्यामुळे अजित पवारांना डावलल्याची चर्चा सुरू झाली होती. या चर्चांनंतर आता अजित पवार यांनी आपल्याला डावललं नसल्याचं सांगत वेळेअभावी आपण भाषण केलं नसल्याची स्पष्टीकरण दिलं. वेळ कमी होता. त्यामुळे वेळेअभावी मी रायगडावर भाषण केलं नाही', असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटलं आहे.

# मुर्शिदाबाद हिंसाचार प्रकरणी मोठी कारवाई!

## मुर्शिदाबाद हिंसाचार प्रकरणी तब्बल 118 जणांना अटक

। ओडिशा।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**वक्फ सुधारणा विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहात मंजूर झालं, त्यानंतर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी देखील या विधेयकाला मंजूरी दिली. त्यानंतर या विधेयकाचं कायद्यातही रूपांतर झालं. मात्र, अद्यापही वक्फ सुधारणा विधेयकाच्या विरोधात विविध ठिकाणी निषेध आंदोलने सुरु आहेत. पश्चिम बंगालमध्ये या विधेयकाच्या विरोधात नागरिकांकडून तीव्र निषेध व्यक्त केला जात आहे. मुर्शिदाबादमध्ये वक्फ कायद्याविरोधातील झालेल्या निदर्शनाला हिंसक वळण लागल्याने येथे मोठा तणाव निर्माण झाला आहे.**





८ एप्रिल रोजी देखील या ठिकाणी काढण्यात आलेल्या आंदोलनाला हिंसक वळण लागलं होतं. यानंतर पुन्हा एकदा हिंसक वळण लागल्याने तणाव निर्माण झाला आहे. आता पश्चिम बंगाल पोलिसांनी मुर्शिदाबादमध्ये झालेल्या हिंसाचार प्रकरणी मोठी कारवाई केली आहे. हिंसाचार प्रकरणात पोलिसांनी तब्बल ११८ जणांना अटक केली आहे. जमावाला नियंत्रित करण्यासाठी पोलिसांना चार राउंड गोळीबार करावा लागला होता. यामध्ये दोन जण जखमी झाल्याची माहिती सांगितली जात आहे. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे.मुर्शिदाबादमध्ये वक्फ कायद्याविरोधातील निदर्शनादरम्यान शुक्रवारी मोठा जमाव जमला होता. या जमावाला नियंत्रित करण्याचा प्रयत्न करताना १५ पोलीस कर्मचारीही जखमी झाल्याची माहिती सांगितली जाते. तसेच शनिवारी सकाळी शमशेरगंजमध्येही पुन्हा हिंसाचार झाला. मात्र, पोलिसांनी तात्काळ परिस्थितीवर नियंत्रण मिळवलं. दरम्यान, या संपूर्ण भागात आता पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आलेला आहे. मुर्शिदाबादमधील हिंसाचाराबाबत पोलीस महासंचालक राजीव कुमार यांनी पत्रकार परिषद घेत म्हटलं की, “आम्ही गुंडगिरी सहन करणार नाही. आम्ही त्याचा अतिशय कडकपणे सामना करू. पोलीस कमीत कमी बळाचा वापर करतात. मात्र, मी हे स्पष्ट करू इच्छितो की, आम्ही परिस्थितीला कडकपणे सामोरं जाऊ. सुरुवातीला निदर्शने झाली. पण नंतर सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाले आणि त्याला हिंसक वळण लागलं. काल रात्री आम्ही परिस्थिती नियंत्रणात आणली. सकाळी पुन्हा एकदा दंगल उसळली आणि आम्ही पुन्हा परिस्थिती नियंत्रणात आणली. गुन्हेगारांनी कायदा हातात घेतला तर आम्ही कडक कारवाई करू, तसेच अफवा परवणाऱ्यांवरी कडक कारवाई केली जाईल”, असा इशारा राजीव कुमार यांनी दिला. दरम्यान, “सुती पोलीस ठाण्याअंतर्गत येणाऱ्या सुजरमोर क्रॉसिंगवर आंदोलकांनी राष्ट्रीय महामार्ग रोखल्यामुळे मोठा गोंधळ निर्माण झाला होता. पण त्यानंतर आम्ही लाठीचार्ज केला आणि अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या. मात्र, यावेळी जमावाने सार्वजनिक मालमत्ता आणि सार्वजनिक बसेसची तोडफोड आणि आग लावण्याचा प्रयत्न केला. तसेच जमावाने पोलिसांवर हल्ला केला. त्याला प्रत्युत्तर म्हणून आम्हाला गोळीबार करावा लागला. चार राउंड गोळीबार करण्यात आला. यामध्ये दोन जण जखमी झाले आहेत. तसेच यामध्ये पंधरा पोलीस जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत”, अशी माहिती डीजी जावेद शमीम यांनी सांगितली.८ एप्रिल रोजी देखील या ठिकाणी काढण्यात आलेल्या आंदोलनाला हिंसक वळण लागलं होतं. यानंतर पुन्हा एकदा हिंसक वळण लागल्याने तणाव निर्माण झाला आहे. आता पश्चिम बंगाल पोलिसांनी मुर्शिदाबादमध्ये झालेल्या हिंसाचार प्रकरणी मोठी कारवाई केली आहे.

### शमशेरगंजमध्येही पुन्हा हिंसाचार

हिंसाचार प्रकरणात पोलिसांनी तब्बल ११८ जणांना अटक केली आहे. जमावाला नियंत्रित करण्यासाठी पोलिसांना चार राउंड गोळीबार करावा लागला होता. यामध्ये दोन जण जखमी झाल्याची माहिती सांगितली जात आहे. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे.मुर्शिदाबादमध्ये वक्फ कायद्याविरोधातील निदर्शनादरम्यान शुक्रवारी मोठा जमाव जमला होता. या जमावाला नियंत्रित करण्याचा प्रयत्न करताना १५ पोलीस कर्मचारीही जखमी झाल्याची माहिती सांगितली जाते. तसेच शनिवारी सकाळी शमशेरगंजमध्येही पुन्हा हिंसाचार झाला. मात्र, पोलिसांनी तात्काळ परिस्थितीवर नियंत्रण मिळवलं.

# वक्फ कायद्याबाबत विरोधी पक्षनेत्याचे मौन!

## वक्फ कायद्याबाबत मायावतींचा राहुल गांधींवरही संताप

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**वक्फ सुधारणा विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहात मंजूर झाल्यानंतर त्यास राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देखील मंजुरी दिली आहे. त्यामुळे आता वक्फ सुधारणा विधेयक २०२५ चे कायद्यात रुपांतर झाले आहे. अनेक मुस्लीम संघटना, ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन पक्ष, आम आदमी पार्टी, काँग्रेससह काही विरोधी पक्षांनी या कायद्याविरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. अनेकांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या आहेत. तर, अनेक मुस्लीम संघटना रस्त्यावर उतरल्या आहेत.**



बसपाने वक्फ कायद्यावरून केवळ केंद्रातील मोदी सरकारवरच नव्हे तर काँग्रेस व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधींवरही संताप व्यक्त केला आहे. बसपाच्या प्रमुख मायावती यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. यामध्ये त्यांनी लिहिलं आहे की “लोकसभेत वक्फ सुधारणा विधेयकावर प्रदीर्घ चर्चा झाली. मात्र विरोधी पक्षनेत्याने त्या चर्चेत सहभागी न होणे, सभागृहात काहीही न बोलणे उचित आहे का? त्यांच्या अशा वागण्यामुळे मुस्लीम समुदायात संतापाचं वातावरण असणं स्वाभाविक आहे. त्यामुळेच इंडिया आघाडीत अस्वस्थता निर्माण झाली आहे.”उत्तर प्रदेशच्या माजी मुख्यमंत्री मायावती म्हणाल्या, “देशातील बहुजनांना त्यांच्या हितापासून वंचित ठेवणे, कल्याणापासून दूर ठेवणे आणि सरकारी नोकऱ्या व शिक्षणाचा अधिकार निष्क्रिय करण्याच्या बाबतीत जितकी भाजपा दोषी आहे तितकीच काँग्रेस देखील दोषी आहे. या दोन्ही पक्षांपासून सावध होऊन धार्मिक अल्पसंख्याकांनी त्यांची फसवणूक टाळायला हवी.”मायावती म्हणाल्या, काँग्रेसच्या याच वृत्तीमुळे उत्तर प्रदेशमधील बहुजनांची स्थिती प्रत्येक बाबतीत वाईट आहे. तर भाजपाचे लोक याच गोष्टीचा फायदा घेण्यासाठी टपून बसले आहेत. त्याचबरोबर वीज व इतर सरकारी विभागांमधील वाढत्या खासगीकरणामुळे परिस्थिती अजून चिंताजनक होत आहे. सरकारने सार्वजनिक कल्याणाची त्यांची संवैधानिक जबाबदारी योग्यरित्या पार पडली पाहिजे.तत्पूर्वी मायावती यांनी केंद्र सरकारला नवीन वक्फ कायदा स्थगित करण्याची आणि या कायद्याबाबत नव्याने आढावा घेण्याची विनंत केली होती. वक्फ बोर्डामध्ये गैर-मुस्लिमांना समाविष्ट करण्याची परवानगी देणाऱ्या सुधारित कायद्यातील तरतुदींबद्दल मायावती यांनी चिंता व्यक्त केली आहे.

### मायावती काय म्हणाल्या?

फतेहपूर आणि आझमगड जिल्ह्यात प्रत्येकी तीन, फिरोजाबाद, कानपूर देहात आणि सीतापूर जिल्ह्यात प्रत्येकी दोन, गाजीपूर, गोंडा, अमेठी, संत कबीर नगर आणि सिद्धार्थनगर जिल्ह्यात प्रत्येकी एकाचा मृत्यू झाला आहे. बलिया, कन्नौज, बाराबंकी, जौनपूर आणि उन्नाव जिल्ह्यात प्रत्येकी एकाचा मृत्यू वीज पडून झाला आहे.

## सूर्यवंशम' चित्रपटा आधी अमिताभ यांनी सोडलेले बॉलीवूड



अमिताभ बच्चन यांनी त्यांच्या कारकिर्दीत अनेक सुपरहिट सिनेमांत काम केले. मात्र, एक काळ असा होता की, त्यांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागला होता. त्यांना व्यवसायात मोठा तोटा सहन करावा लागला होता. एबीसीएल या त्यांच्या कंपनीने १९९९ मध्ये दिवाळखोरी जाहीर केली होती.

१९९९ लाच बिग बींचा सूर्यवंशम हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. या चित्रपटात त्यांनी दुहेरी भूमिका साकारली होती. त्यांचा हा चित्रपट खूप गाजला; पण त्याआधी म्हणजे १९९४ ते १९९९ या काळात त्यांनी फक्त चार चित्रपटांत काम केले होते.

मृत्युदाता, मेजर साब, बडे मियाँ छोटे मियाँ व लाल बादशाह या चित्रपटांत ते दिसले होते. त्यामुळे त्यांच्या चाहत्यांना, तसेच काही सहकलाकारांना असे वाटत होते की, त्यांनी अभिनयातून ब्रेक घेतला आहे.सूर्यवंशम चित्रपटात राजेश खट्टरदेखील प्रमुख भूमिकेत होते. त्यावेळी त्यांनाही असे वाटत असे की, अमिताभ बच्चन यांनी अभिनय सोडला आहे. नुकतीच राजेश खट्टर यांनी 'फ्रायडे टॉकिज'ला मुलाखत दिली. या मुलाखतीत राजेश खट्टर यांनी म्हटले, "मला निर्मात्यांनी अमिताभ बच्चन यांचा मुलगा व भाऊ या भूमिका साकारण्यासाठी विचारले होते. त्यासाठी त्यांनी मूळ चित्रपट पाहण्यास सांगितला होता; पण तो मूळ चित्रपट पाहण्यास मी नकार दिला. मला बच्चनसाहेब यांच्याबरोबर काम करण्याची संधी गमवायची नव्हती. मला माझ्या निर्णयावर शंका घ्यायची नव्हती."

# शांती प्रियाने टक्कल का केलं?

सौगंध' चित्रपटात अक्षय कुमारबरोबर मुख्य भूमिकेत झळकलेली बॉलीवूड अभिनेत्री शांती प्रिया तिच्या नव्या पोस्टमुळे चर्चेत आली आहे. शांती प्रियाने इन्स्टाग्रामवर तिचे काही फोटो पोस्ट केले आहेत. या फोटोंमध्ये तिने टक्कल केल्याचं दिसून येत आहे.शांती प्रियाने शेअर केलेल्या ताज्या फोटोंमध्ये तिने टक्कल केल्याचं दिसतंय. तसेच तिने तपकिरी रंगाचं ब्लेझर घातलं आहे. ते तिच्या दिवंगत पतीचं आहे. शांती प्रियाचा पती सिद्धार्थ रायचं २००४ मध्ये निधन झालं. २१ वर्षांनी शांती प्रियाने पतीच्या ब्लेझरमध्ये केलेलं फोटोशूट चर्चेत आहे. तिने स्मोकी आय मेकअप केला आहे, तसेच मॅट मेकअप व सोनेरी कानातले घालून तिचा लूक पूर्ण केला आहे.टक्कल असलेले फोटो शेअर करत शांती प्रियाने लिहिलं, "मी नुकतंच टक्कल केलं आणि माझा अनुभव काहीसा वेगळा आहे. महिला म्हणून आपण बरेचदा आयुष्यात स्वतःला मर्यादा घालतो, नियमांचे पालन करतो आणि स्वतःला पिंजऱ्यात कैद करून ठेवतो. पण या बदलातून मी स्वत: ला मुक्त केलं आहे, सगळ्या मर्यादांमधून मी मुक्त झाले आहे. जगाने आपल्यावर लादलेले ब्यूटी स्टँडर्ड तोडण्याचा माझा हेतू आहे. मी खूप हिमतीने आणि माझ्या अंतःकरणातील विश्वासाने हे केलं आहे."शांती प्रियाचा हा लूक पाहून नेटकरी विविध प्रतिक्रिया देत आहेत. काहींनी तिच्या या लूकचं, तिच्या टक्कल करण्याच्या निर्णयाचं कौतुक केलं आहे. अनेकांनी तिच्या या पोस्टवर लाइक्स व कमेंट्सचा वर्षाव केला आहे. तर काहींनी 'लांब केसात दाक्षिणात्य महिलांचं सौंदर्य आहे, तू हे का केलंस?' असे प्रश्न विचारले आहेत.शांती प्रियाने टाइम्स ऑफ इंडियाशी बोलताना टक्कल करण्याच्या निर्णयाबद्दल साशंक होते असं सांगितलं. कारण फिल्म इंडस्ट्रीत महिलांनी एका विशिष्ट प्रकारेच दिसायला हवं अशी धारणा झाली आहे. अभिनेत्रींचे ग्लॅमरस, सुंदर लांब केस असतात. त्यामुळे टक्कल करताना मनात भीती असल्याचं ती म्हणाली. "मी स्वतःलाच विचारलं की या भीतीमुळे मी माझ्या आवडत्या गोष्टी करू नये का?" असं शांती प्रियाने सांगितलं.



सौगंध' चित्रपटात अक्षय कुमारबरोबर मुख्य भूमिकेत झळकलेली बॉलीवूड अभिनेत्री शांती प्रिया तिच्या नव्या पोस्टमुळे चर्चेत आली आहे. शांती प्रियाने इन्स्टाग्रामवर तिचे काही फोटो पोस्ट केले आहेत. या फोटोंमध्ये तिने टक्कल केल्याचं दिसून येत आहे.शांती प्रियाने शेअर केलेल्या ताज्या फोटोंमध्ये तिने टक्कल केल्याचं दिसतंय. तसेच तिने तपकिरी रंगाचं ब्लेझर घातलं आहे. ते तिच्या दिवंगत पतीचं आहे. शांती प्रियाचा पती सिद्धार्थ रायचं २००४ मध्ये निधन झालं. २१ वर्षांनी शांती प्रियाने पतीच्या ब्लेझरमध्ये केलेलं फोटोशूट चर्चेत आहे. तिने स्मोकी आय मेकअप केला आहे, तसेच मॅट मेकअप व सोनेरी कानातले घालून तिचा लूक पूर्ण केला आहे.टक्कल असलेले फोटो शेअर करत शांती प्रियाने लिहिलं, "मी नुकतंच टक्कल केलं आणि माझा अनुभव काहीसा वेगळा आहे. महिला म्हणून आपण बरेचदा आयुष्यात स्वतःला मर्यादा घालतो, नियमांचे पालन करतो आणि स्वतःला पिंजऱ्यात कैद करून ठेवतो. पण या बदलातून मी स्वत: ला मुक्त केलं आहे, सगळ्या मर्यादांमधून मी मुक्त झाले आहे. जगाने आपल्यावर लादलेले ब्यूटी स्टँडर्ड तोडण्याचा माझा हेतू आहे. मी खूप हिमतीने आणि माझ्या अंतःकरणातील विश्वासाने हे केलं आहे."शांती प्रियाचा हा लूक पाहून नेटकरी विविध प्रतिक्रिया देत आहेत. काहींनी तिच्या या लूकचं, तिच्या टक्कल करण्याच्या निर्णयाचं कौतुक केलं आहे. अनेकांनी तिच्या या पोस्टवर लाइक्स व कमेंट्सचा वर्षाव केला आहे. तर काहींनी 'लांब केसात दाक्षिणात्य महिलांचं सौंदर्य आहे, तू हे का केलंस?' असे प्रश्न विचारले आहेत.

# कपिल शर्माच्या वागणूकीवर मुकेश खन्नांची नाराजी

अभिनेते मुकेश खन्ना हे बॉलीवूड चित्रपटांसाठी ओळखले जातात. मात्र, टीव्हीवरील शक्तिमान या मालिकेने त्यांना मोठी लोकप्रियता मिळवून दिली. अनेकजण त्यांना शक्तीमान म्हणून ओळखतात. ज्येष्ठ अभिनेते अनेकदा त्यांच्या वक्तव्यांमुळे मोठे चर्चेत असतात.

अमिताभ बच्चन यांची मी मिमिक्री करतोय, असे अनेकांनी त्यांना म्हटल्याचे त्यांनी वक्तव्य केले होते. त्यांच्या अभिनयाबरोबरच ते त्यांच्या परखड वक्तव्यामुळे मोठ्या चर्चेत असतात. आता त्यांनी नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत संपूर्ण देश माझ्या पाया पडतो. मात्र, आता हा शिष्टाचार इंडस्ट्रीमधून नाहीसा होत असल्याचे वक्तव्य केले. तसेच कपील शर्मामध्ये शिष्टाचार नसल्याचे म्हटले आहे.

मुकेश खन्ना यांनी नुकतीच 'अनसेन्सॉर विथ शार्दुल' या युट्यूब चॅनेलला मुलाखत दिली. या मुलाखतीत कपिल शर्माबद्दल मुकेश खन्ना म्हणाले, "मला कपिल शर्मा का आवडत नाही आणि का मला त्याच्या शोमध्ये जाण्यास नकार दिला. याचे एक कारण आहे. ती गोष्ट सर्वांचे डोळे उघडणारी आहे. गोल्ड पुरस्कार सोहळ्यात मला एक पुरस्कार देण्यात आला होता. त्या पुरस्कार सोहळ्यात कपिल शर्मादेखील उपस्थित होता. तो त्यावेळी इंडस्ट्रीमध्ये नवीन आला होता. त्यालादेखील पुरस्कार देण्यात आला होता. त्यावेळी तो कॉमेडी सर्कस हा शो करायचा. तो आला आणि माझ्या शेजारी बसला. त्याने मला ओळखही दिली नाही. तो जवळजवळ २० मिनिटे तिथे बसला होता.

पुरस्कारासाठी जेव्हा त्याचे नाव घेण्यात आले तेव्हा तो पुरस्कार घेऊन गेला."पुढे मुकेश खन्ना यांनी अनेक कलाकारांना सार्वजनिक ठिकाणी भेटल्याची उदाहरणे दिली. मुकेश खन्ना म्हणाले, "मी अमिताभ बच्चन यांना अनेकदा विमानात भेटलो आहे. मी लंडनहून परत येत होतो, त्याचवेळी अमिताभ बच्चनदेखील लंडनहून परतत होते. आमची विमानात भेट झाली.

आम्ही एकमेकांना तसे ओळखत नाही. पण त्यांना माहित होते आम्ही दोघेही कलाकार आहे. आम्ही दोघे एकमेकांशी बोललो." पुढे ते म्हणाले, एकदा हृतिक रोशन व मी विमानतळावर उभे होतो. तो मला भेटला आणि म्हणाला की विमानतळावर दोन सुपरस्टार उभे आहेत. जरी तुम्ही एखाद्या व्यक्तीला कधीही भेटला नसाल तरी तुम्ही त्यांना पाहिल्यानंतर त्यांच्याशी बोलता, हे संस्कार आहेत.

इंडस्ट्रीमधील ही बंधुता आहे. पण, कपिल शर्मामध्ये जरासुद्धा शिष्टाचार नाही", असे परखड वक्तव्य मुकेश खन्ना यांनी केले.

# अभिषेकच्या शतकाचं अनोखं सेलिब्रेशन!

## अभिषेकने 19 चेंडूत अर्धशतक तर 40 चेंडूत शतक झळकावलं

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**अभिषेक शर्मानि पंजाब किंग्सविरूद्ध सामन्यात अनोख्या अंदाजात फलंदाजी करत सर्वांनाच आश्चर्यचकित केलं. पहिल्याच चेंडूपासून चौकार-षटकारांचा पाऊस पाडत अभिषेकने आपल्या वादळी फलंदाजीला सुरूवात केली आणि संघासाठी एक रेकॉर्डब्रेकिंग विजयी खेळी साकारत तो माघारी परतला. पण यादरम्यान त्याच्या शतकाच्या सेलिब्रेशनने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं.**



पंजाब किंग्सने या सामन्यात दिलेल्या २४६ लक्ष्याचा पाठलाग करताना अभिषेक शर्मानि वादळी फलंदाजी केली. अभिषेक शर्मानि १९ चेंडूत अर्धशतक तर ४० चेंडूत शतक झळकावलं. तर ट्रॅव्हिस हेडबरोबर त्याने १७१ धावांची सलामीची भागीदारी रचली. अभिषेक शर्मानि शतक झळकावताच त्याने सिंहासारखी गर्जना करत आनंद साजरा केला. यानंतर त्याने एक चिठ्ठी काढत सर्वांना मैदानात दाखवली.अभिषेक शर्मानि ५५ चेंडूत १४१ धावांची खेळी केली. या विक्रमी खेळीत त्याने १४ चौकारांव्यतिरिक्त १० षटकारही मारले. अभिषेकने २५६.३६ च्या स्ट्राईक रेटने फलंदाजी करत सर्वांना मंत्रमुग्ध करणारी फलंदाजी केली. सतराव्या षटकात अर्शदीप सिंगने अभिषेकला झेलबाद केले. आयपीएलच्या इतिहासात सर्वात जलद शतक करणारा अभिषेक सहावा फलंदाज ठरला. तर आयपीएलमध्ये सर्वात मोठी धावसंख्या रचणारा तो पहिला भारतीय फलंदाज आहे.खरंतर, शतकानंतर अभिषेकने खिशातून एक चिठ्ठी काढली आणि एका खास पद्धतीने सेलिब्रेशन केलं. अभिषेकच्या त्या चिठ्ठीवर लिहिलं होतं की हे शतक ऑरेंज आर्मीसाठी आहे. विशेष म्हणजे मैदानावर उपस्थित असलेले श्रेयस अय्यर आणि युजवेंद्र चहल यांनीही अभिषेककडून ती चिठ्ठी मागितली आणि ती वाचली. या संपूर्ण घटनेचा व्हीडिओ आणि फोटो सध्या व्हायरल होत आहे.अभिषेक शर्माच्या या वादळी शतकासह सनरायझर्स हैदराबाद संघाने एक अनोखा आणि ऐतिहासिक विजय नोंदवला आहे. २४६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना हैदराबादने पंजाब किंग्सवर १० चेंडू राखून आणि ८ विकेट्सने अनपेक्षित विजयाची नोंद केली. सलग चार सामन्यांमध्ये पराभूत झाल्यानंतर हैदराबादने जोरदार पुनरागमन केलं आहे.

अभिषेक शर्माच्या झंझावाती शतकाच्या बळावर सनरायझर्स हैदराबाद संघाने २४६ धावांचं डोंगराएवढं लक्ष्य सहजी पार करून दाखवलं. आयपीएलच्या इतिहासात धावांचा पाठलाग करतानाची ही दुसरी सर्वोच्च धावसंख्या आहे. या विक्रमी विजयाचा केंद्रबिंदू ठरला युवा डावखुरा सलामीवीर अभिषेक शर्मा. अभिषेकने पंजाबच्या गोलंदाजांच्या ठिकऱ्या उडवत अवघ्या ४० चेंडूतच शतक गाठलं. अभिषेकने ५५ चेंडूत १४१ धावांची अविश्सनीय खेळी साकारली. अभिषेक आणि ट्रॅव्हिस जोडीने १२.२ षटकात १७१ धावांची तडाखेबंद सलामी दिली. या भागीदारीनेच हैदराबादच्या विजयाचा पाया रचला. अभिषेकच्या खेळीने असंख्य विक्रम मोडीत निघून नवे रचले गेले. हैदराबादने ८ विकेट्स आणि ९ चेंडू राखून हा सामना जिंकला.२४६ धावांचं प्रचंड लक्ष्य समोर असताना अभिषेक आणि ट्रॅव्हिस जोडीने पहिल्या चेंडूपासून चौकार, षटकारांची बरसात केली. अभिषेकने सूत्रधाराची भूमिका स्वीकारत पंजाबच्या गोलंदाजांना निष्प्रभ ठरवलं. वेगवान गोलंदाज असोत की फिरकीपटू अभिषेक फटके लगावत गेला, ते चौकार-षटकार होत गेले. हेडनेही हात धुवून घेत फटकेबाजी केली. १३व्या षटकात युझवेंद्र चहलला मोठा फटका खेळताना हेड बाद झाला.

### हैदराबादचा अविश्वसनीय विक्रमी

त्याने ३७ चेंडूत ६६ धावांची खेळी केली. हेड बाद झाल्यावर अभिषेकने आणखी आक्रमक पवित्रा स्वीकारत पंजाबला पुनरागमनाची संधी मिळणार नाही याची काळजी घेतली. ५५ चेंडूत १४ चौकार आणि १० षटकारांसह १४१ धावांची मॅरेथॉन खेळी साकारून अभिषेक परतला तेव्हा हैदराबादच्या विजयाची औपचारिकता बाकी उरली होती. पंजाबचा प्रमुख गोलंदाज लॉकी फर्ग्युसन दुखापतीमुळे केवळ दोनच चेंडू टाकून ड्रेसिंगरुममध्ये परतला. दुखापतीचं स्वरुप गंभीर असल्याने लॉकी पुन्हा गोलंदाजीला आला नाही.हैदराबादच्या संघाने पंजाब किंग्सने दिलेल्या २४६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना वेगळ्याच गतीने फलंदाजी केली. अभिषेक शर्मा आणि ट्रॅव्हिस हेड यांनी १७५ धावांची भागीदारी रचत अनोखी सुरूवात करून दिली. तर अभिषेक शर्मान आयपीएल इतिहासातील त्याचे पहिलं शतक झळकावलं. ट्रॅव्हिस हेड ३७ चेंडूत ९ चौकार आणि ३ षटकारांसह ६६ धावा करत झेलबाद झाला.

---

# मोहम्मद शमीच्या गोलंदाजीची खांडोळी

## मोहम्मद शमी ठरला सर्वाधिक धावा देणारा भारतीय गोलंदाज

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**टीम इंडियाचा अनुभवी गोलंदाज मोहम्मद शमीसाठी शनिवारचा दिवस आत्यंतिक निराशेचा ठरला. हैदराबादच्या मैदानावर पंजाबच्या फलंदाजांनी शमीच्या ४ षटकात तब्बल ७५ धावा चोपून काढल्या.**



आयपीएल इतिहासात सर्वाधिक धावा देण्याचा विक्रम जोफ्रा आर्चरच्या नावावर आहे. आर्चरच्या ४ षटकात ७६ धावांची लूट झाली होती. शमीचे आकडे या नकोशा यादीत दुसऱ्या क्रमांकावर आहेत. आयपीएल स्पर्धेत भारतीय गोलंदाजाने एका षटकात दिलेल्या सर्वाधिक धावांचा विक्रम शमीच्या नावे झाला आहे.शमीने ३ षटकात ४८ धावा दिल्या होत्या. पंजाबच्या डावाचं शेवटचं षटक टाकण्याची जबाबदारी कर्णधार पॅट कमिन्सने शमीकडे सोपवली. दक्षिण आफ्रिकेच्या मार्को यान्सनने एक धाव घेत ऑस्ट्रेलियाचा अष्टपैलू खेळाडू मार्कस स्टॉइनसला स्ट्राईक दिला. यानंतर स्टॉइनसने २ धावा घेतल्या. यानंतर स्टॉइनसने एकापाठोपाठ एक ४ उत्तुंग षटकार मारले. ४ षटकारांमुळे शमीचे आकडे एकदमच खराब झाले. त्याच्या ४ षटकात तब्बल ७५ धावा लुटल्या गेल्या. स्टॉइनसने अवघ्या ११ चेंडूत नाबाद ३४ धावांची खेळी केली.गंभीर अशा दुखापतीतून सावरत शमीने यंदाच्या वर्षीच पुनरागमन केलं होतं. मोहम्मद शमीला २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकादरम्यान पायाच्या घोट्याला दुखापत झाली होता. त्यानंतर तो टीम इंडियाच्या बाहेर होता. यानंतर फेब्रुवारी २०२४ मध्ये त्याच्या घोट्यावर शस्त्रक्रिया करावी लागली. त्यानंतर देशांतर्गत क्रिकेट खेळून त्याने फिटनेसची चाचणी घेतली आणि टीम इंडियात पुनरागमन केले. शमीने रणजी ट्रॉफी, सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी आणि विजय हजारे ट्रॉफीमध्ये बंगाल संघासाठी चांगली कामगिरी केली. मोहम्मद शमीची चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी भारतीय संघात निवड झाली. २८ जानेवारी रोजी इंग्लंडविरुद्ध तब्बल ४३५ दिवसांनंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पुनरागमन केलं होतं.वेगासह यॉर्कर, बाऊन्सर अशी असंख्य अस्त्रं भात्यात असणारा शमी टीम इंडियाचा प्रमुख गोलंदाज आहे. शमीने ६४ टेस्ट, १०८ वनडे आणि २५ टी२० सामन्यात भारताचं प्रतिनिधित्व केलं आहे. २०१३ मध्ये शमीने आयपीएल स्पर्धेत कोलकाता नाईट रायडर्स संघासाठी पदार्पण केलं.

### हैदराबादने तब्बल 10 कोटी रुपये

२०२२-२०२४ या काळात गुजरात टायटन्स या नव्या संघाने शमीला ताफ्यात समाविष्ट केलं. त्या हंगामात शमीने २० विकेट्स पटकावल्या होत्या. त्याच वर्षी शमीने मानाचा परपल कॅप पुरस्कारही पटकावला होता. यंदाच्या हंगामापूर्वी झालेल्या लिलावात हैदराबादने तब्बल १० कोटी रुपये खर्चून शमीला संघात समाविष्ट केलं होतं.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। रविवार ।
। दि. 13 एप्रिल 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## जीवनात अनेक अडचणी, समस्या येतात

# समस्येकडे संधी म्हणून पहा:डॉ. राजेंद्रकुमार शर्मा

### शिक्षण विश्व: पीसीसीओईआर मध्ये 'टेक्नोव्हेट 2025' महोत्सव उत्साहात

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**जीवनात अनेक अडचणी, समस्या येतात. परंतु त्याकडे सकारात्मकपणे पाहिले तर नवीन संधी दिसते. या संधीतून नवनवीन संकल्पना उदयास येत असतात त्यांचे वास्तवात रूपांतर करून त्या आत्मसात करा आणि त्याचा समाजाला उपयोग झाला पाहिजे असे मार्गदर्शन डॉ. राजेंद्रकुमार शर्मा यांनी केले.**




पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च (पीसीसीओईआर) येथे 'टेक्नोव्हेट २०२५' या तांत्रिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. त्याचे उद्घाटन डॉ. राजेंद्रकुमार शर्मा आणि संगीता शर्मा यांच्या हस्ते करण्यात आले. यामध्ये विविध तांत्रिक व सर्जनशील प्रकल्प सादर करत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. ब्रो कोड, एरर ४०४, ब्रिजिंग माईंड्स, कॅड ओ क्रिएट, इलेक्ट्रोथॉन या नाविन्यपूर्ण व रोचक स्पर्धा घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी या सर्व स्पर्धांमध्ये तंत्रज्ञान, सर्जनशीलता आणि टीमवर्कद्वारे आपली कौशल्ये सादर केली.स्वागत प्राचार्य डॉ. हरीश तिवारी, प्रास्ताविक डॉ. शिवगंगा गव्हाणे आणि आभार प्रा. प्रीती राजपूत यांनी मानले. विद्यार्थी समन्वयक वैभवी लाटे, प्रज्ञा पानसरे, कौस्तुभ पाटील आणि आराध्या मिनाजगी यांनी आयोजनात सहभाग घेतला.पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्मा भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी सहभागी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.




CERTIFICATION COURSE BY MORAYA SHIKSHAN SANSTHA, CHINCHWAD



शिक्षणाबरोबरच सुसंस्कारित व्यक्तिमत्त्व घडविणारी शाळा

2025-26
ADMISSIONS
OPEN

प्रज्ज्वलितो ज्ञानमियो प्रदीपः
"यत् भावो – तत् भवति"

# मोरया शिक्षण संस्था, चिंचवड
# डिप्लोमा इन मॉन्टेसरी आणि नर्सरी शिक्षक प्रशिक्षण






* राष्ट्रीय स्तरावर वैध प्रमाणपत्र
* प्रात्यक्षिकवर भर,
* ग्रंथालय सुविधा
* अध्यापन शास्त्राबद्दलची माहिती
* बाल मानसशास्त्र व पोषण आणि खूप काही..

* शुल्क: १६,०००/- (२ हप्त्यांसह)
* १ सेमिस्टर कोर्स
* अभ्यासक्रम कालावधी: १५ जून २०२५ ते १५ डिसेंबर २०२५
* वेळ : सकाळी १० ते दुपारी २

प्लॉट क्र. 13, मोरया कॉलनी, सुदर्शन नगर, गोलांडे राम मंदिरासमोर, चिंचवड, पुणे 33

संपर्क
सुचित्रा आपटे - ९३२५१३२४०२
भाग्यश्री पंडित - ८०८७७०६१००

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI

2025-26
ADMISSIONS
OPEN

PRIYADARSHANI
SCHOOL, ALANDI

42 YEARS OF ENRICHING EXPERIENCE IN EDUCATION

50 FIFTY PLUS NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS SCHOOLS

Contact Us Now
86687 55826
98232 31705

Wadgoan road, Sr.no. 98,
Opposite Ram Mandir,
Alandi 412105




Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
Powered by
JAI HIND EDUTECH
ADMISSION
OPEN
2025-2026
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
Computer Science
Crop Science
Electronics
Mechanical / Technical Automobile
Information Technology (IT)
For Commerce Stream
Banking
Marketing & Sales
Office Management
Small Industries & Self employment
Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
PROUD PARENTS.
OUR BIGGEST
PRIDE.
ADMISSIONS OPEN FOR 2025-26
CBSE Curriculum, Aligned with NEP & NCF
Ambitious Projects like 'Read-to-Lead'
Legacy of 100% Results
Gayatri English Medium School & Jr. College
95277 64646 / 77967 67292
BRANCHES AT: CHARHOLI | MOSHI | DHANORE

KAMALA EDUCATION SOCIETY'S

KAMALA Education Society

# PRATIBHA INSTITUTE OF BUSINESS MANAGEMENT

**AICTE Permanent ID: 1-3675161 | DTE Code: 6167**

Approved by AICTE | B+ NAAC Accredited | Permanently Affiliated to Savitribai Phule Pune University

## ADMISSIONS OPEN

Full Time Undergraduate Courses (3 Years Degree Course, 4 Years Honours)

# BBA



**Bachelor of Business Administration**

# BCA



**Bachelor of Computer Applications**

### Highlights:

- Advanced Industrial and Research Learning
- Proven Track Record of Placements
- Mentoring and Seed Funds for Startups
- Skill Development and Certification Courses
- Live Industrial Projects
- Earn and Learn Scheme of Rs. 10,00,000+
- Govt. and Management Scholarships
- State of the Art infrastructure
- ICT enabled classrooms

Eligibility: Passed HSC Examination with any stream

**Call for more details:**

**BBA : Prof. Gururaj - 8624991767 | Dr. Pallavi - 9225635556**

**BCA : Prof. Manish - 9823223336 | Prof. Surabhi - 9049004895**

www.pibmpune.org.in

Scan QR code to know more


MASTER MIND GLOBAL
SCHOOL & Jr. College
(CBSE)
( Since 2013)
ADMISSIONS
OPEN FOR
NURSERY TO 12TH
Where There is
Creativity, There is
Master Mind
STAR
RANKING
Excellence in Education & Disciplined Environment
Co-Curricular & Extra Curricular Activities
Guaranteed Safety & Security
A++ Grade
In Leadership & Quality
Management
Contact : +91 7218125125
E-mail : mastermindglobalschool.com
Website : www.http://mastermindglobalschool.com